# जनसंपर्क अधिकारी
## पोलीस अधीक्षक कार्यालय, जळगांव
फोन ०२५७-२२२१७१० फॅक्स ०२५७-२२२०५११
Email ID:-sp.jalgaon@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र- ११६** | **दिनांक :- ३१/०८/२०२६**

## " एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील घरफोडीचा गुन्हा अवघ्या २४ तासांत उघडकीस; दोन आरोपी जेरबंद, एकुण ३१,२६,८००/- रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत "

===ooo===

**एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीतील रामेश्वर कॉलनी येथे झालेल्या घरफोडीचा गुन्हा अवघ्या २४ तासांत उघडकीस आणून दोन आरोपींना जेरबंद करण्यात एमआयडीसी पोलीसांना यश आले आहे. आरोपींकडून चोरीस गेलेल्या एकुण ३१,२६,८००/- रुपये किंमतीचे सोन्या-चांदीचे दागिन्यांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

दिनांक **२७/०८/२०२६ रोजी रात्री ०३.३० वा. ते २८/०८/२०२६ रोजी रात्री ०३.३० वा.** दरम्यान फिर्यादी **संगीता और घुगे**, रा. रामेश्वर कॉलनी, जळगाव या परिवारासह उज्जैन, मध्य प्रदेश येथे दर्शनासाठी गेल्या असताना अज्ञात चोरट्याने त्यांच्या बंद घराच्या दरवाज्याची कडी-कोंयडा तोडून घरात प्रवेश केला. चोरट्याने घरातील सोन्याचे दागिने व रोख रक्कम असा मुद्देमाल चोरी करून नेला. फिर्यादी घरी परतल्यानंतर घरफोडी झाल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार एमआयडीसी पोलीस ठाणे येथे **गु.र.नं. ६९७/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम ३०५(ए), ३३१(३), ३३१(४) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.**

गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन **मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे** यांनी एम.आय.डी.सी. पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. बबन आव्हाड यांना सदर गुन्ह्याचा सखोल तपास करून आरोपींचा शोध घेण्याबाबत तसेच गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्याबाबत आवश्यक मार्गदर्शन व सूचना दिल्या. त्यानुसार पोलीस निरीक्षक श्री. बबन आव्हाड यांनी आपल्या अधिपत्याखालील गुन्हे शोध पथकांतील पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत धनके व अंमलदार यांचे विशेष पथक तयार करून आरोपींचा तात्काळ शोध घेणे व गुन्ह्यातील मुद्देमाल हस्तगत करण्याबाबत आवश्यक सूचना दिल्या.

सदर पथकाने घटनास्थळाची बारकाईने पाहणी करून घटनास्थळावरील महत्त्वाचे पुरावे संकलित केले. तसेच **तांत्रिक तपास, सीसीटीव्ही फुटेज व गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी १) विशाल मुरलीधर दाभाडे, वय २५ वर्षे, व्यवसाय मजुरी २) जितेंद्र मुरलीधर दाभाडे वय २७ वर्षे, दोन्ही रा. सप्तश्रृंगी माता मंदिराजवळ, रामेश्वर कॉलनी, जळगाव यांना ताब्यात घेण्यात आले.**

आरोपींकडे कौशल्यपूर्ण व सखोल चौकशी केली असता त्यांनी त्यांनी सदर गुन्ह्यातील चोरीबाबत माहिती दिल्यानंतर त्यांच्या ताब्यातून **सोन्याचे विविध दागिने व चांदीचे जोडवे असा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.**

**जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालाचा तपशील :-**

१. सोन्याचे गळयातील गंठन - १३१.००० मिली ग्रॅम
२. सोन्याची मिनी पाटली - १४.००० मिली ग्रॅम
३. सोन्याची फॅन्सी शॉर्ट पाटली - १२.००० मिली ग्रॅम
४. सोन्याची काळेमणी पाटली - १६.००० मिली ग्रॅम
५. सोन्याचे टॉप्स - १.९६० मिली ग्रॅम
६. सोन्याचा दागिना - ७.२०० मिली ग्रॅम
७. फुलांच्या डिझाईनची सोन्याची अंगठी - ३.३०० मिली ग्रॅम
८. फॅन्सी खड्यांची डिझाईन असलेली सोन्याची अंगठी - ३.८०० मिली ग्रॅम
९. सोन्याची नथ - ०.५१० मिली ग्रॅम
१०. बारीक खड्यांची नक्षी असलेली सोन्याची अंगठी - ३.५८० मिली ग्रॅम
११. डिझाईन असलेली सोन्याची अंगठी - २.६५० मिली ग्रॅम
१२. हदयाच्या चिन्हाची डिझाईन असलेली सोन्याची अंगठी - २.०८० मिली ग्रॅम
१३. सोन्याची बादामछाप अंगठी - ३.००० मिली ग्रॅम
१४. सोन्याची बादामछाप अंगठी - ३.००० मिली ग्रॅम
१५. सोन्याची बादामछाप अंगठी - ४.००० मिली ग्रॅम
१६. चांदीचे जोडवे - २८ ग्रॅम, एकूण ०५ नग

---

**एकूण मुद्देमाल- ३१,२६,८००/- रुपये किंमतीचे २०८ ग्रॅम सोने व २८ ग्रॅम चांदी**

सदर कारवाई मा. श्री. श्रीकांत धिवरे, पोलीस अधीक्षक, जळगाव, श्री. संदीप गावीत, अपर पोलीस अधीक्षक, जळगाव परिमंडळ तसेच श्री. नितीन गणापुरे, उपविभागीय पोलीस अधिकारी, जळगाव उपविभाग, जळगाव यांच्या मार्गदर्शनाखाली, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. बबन आव्हाड, एमआयडीसी पोलीस स्टेशन यांच्या नेतृत्वाखाली पोलीस उपनिरीक्षक चंद्रकांत धनके, ग्रेड पोलीस उपनिरीक्षक विजयसिंग पाटील, पोलीस हेड कॉन्स्टेबल रामकृष्ण पाटील, रमेश चौधरी, किरण चौधरी, पोलीस नाईक प्रदीप चौधरी, तसेच पोलीस कॉन्स्टेबल रमाकांत साळुंखे, नितीन ठाकूर, राहुल घेटे, गणेश टेकर, किरण पाटील, शशिकांत मराठ, ललित नारखेडे, विशाल कोळी, योगी पुगे व सुभाष साबळे यांनी उल्लेखनीय कामगिरी केलेली .

*******************************************************************************




एमआयडीसी पोलीस स्टेशन, जळगाव
सिसिटीएनएस क्रं.६९७/२०२६ ,
भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (अ),
३३१ (३), ३३१ (४)